MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

maharashtraaarambh@gmail.com

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -९२ | गुरूवार दि.२१ डिसेंबर २०२३ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -92 | THURSDAY DT.21 DECEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## कारला अचानक आग ;चालक वाचला शेजाऱ्याचा मृत्यू

अंबाजोगाई : तालुक्यात घडलेल्या एका धक्कादायक घटनेनं खळबळ उडाली आहे.अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूरजवळ लातूर अंबाजोगाई रोडवर एक कार जळून खाक झाली आहे. अचानक आग लागल्यामुळे गोंधळ उडाला. या घटनेच चालकाच्या बाजूला बसलेल्या व्यक्तीचा आगीत जळून मृत्यू झाला आहे. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केलं. अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूरजवळ लातूर अंबाजोगाई रोडवर एक कार जळून खाक झाली आहे. यामध्ये चालकाच्या बाजूला बसलेल्या व्यक्तीचा कारमध्ये जळून मृत्यू झाला आहे. कारमध्ये होरपळलेल्या या व्यक्तीची अद्याप ओळख अजूनही पटलेली नाही.

# सरकार अन् मनोज जरांगेंमधील बैठक निष्फळ

## 'सगेसोयरे' शब्दावर चर्चा थांबली...

जालना : सरकारचे शिष्टमंडळ मनोज जरांगे यांच्या भेटीसाठी आंतरवाली सराटीमध्ये दाखल झाले असून, बऱ्याच वेळ चालेल्या चर्चेतून कोणताही मार्ग निघालेला नाही. त्यामुळे सरकार अन् मनोज जरांगेंमधील बैठक निष्फळ ठरली आहे. नोंदी असलेल्या सबंधीत नातेवाईकांना आणि सर्व रक्तातील सगेसोयरे यांना हे प्रमाणपत्र मिळावे. रक्ताचे सगेसोयरे हा शब्द आपण गृहीत धरला होता. आमच्या मामाला किंवा मावशी यांना देखील प्रमाणपत्र मिळावे, या मागणीवर जरांगे ठाम आहेत. मात्र, असे करता येणार नाही आणि तसा निर्णय देखील घेता येणार नसल्याचे गिरीश महाजन म्हणाले आहे. त्यामुळे आजची बैठक निष्फळ ठरली आहे.

दरम्यान यावेळी बोलतांना गरीश महाजन म्हणाले की, ओबीसीच्या आरक्षणाला धक्का न लावता आम्हाला हे आरक्षण द्यायचं आहे. चर्चेची दारं खुली असली तर मार्ग निघेल. सोयरा शब्दावरून जरांगे आणि आमची वेगवेगळी मतं आहे. विमल मुंदडा केसचा संदर्भ पाहता मुंदडा मुळच्या एससी होत्या. लग्नानंतर त्या मारवाडी झाल्या. त्यामुळे, ज्यांचे कुणबी दाखले आहेत ते ओबीसी आहेत. त्यांच्या रक्तातल्या नात्यातल्या लोकांना आरक्षण देणं बंधनकारक आहे, असेही महाजन म्हणाले.



आईच्या जातीवरून मुलांची जात ठरत नाही...

पुढे बोलतांना महाजन म्हणाले की, महिलेवरून तिच्या मुलांची जात ठरत नाही. वडिलांच्या दाखल्यावरूनच मुलांची जात ठरते. न्या. शिंदेंच्या अध्यक्षतेखाली रात्रंदिवस काम सुरू आहे. शेवटच्या माणसाची नोंद बघेपर्यंत कार्यवाही चालूच राहणार. महिन्या दीड महिन्यात हा प्रश्न निकाली लागणार आहे. आम्हाला कायद्याने टिकणारं आरक्षण द्यायचं आहे. मराठा आंदोलक मुंबईकडे जाण्याची बातमी आल्याने, काळजी म्हणून पोलिसांनी नोटीसा दिल्या आहेत. पोलिसांनी काळजी घेणे गरजेच आहे. पोलिसांना थोडी कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने काळजी घ्यावी लागेल, असे गिरीश महाजन म्हणाले आहे.

मुख्यमंत्री शब्द पाळत नाही...


दरम्यान याबाबत बोलतांना मनोज जरांगे म्हणाले की, समाज म्हणून मुख्यमंत्री साहेबांचा शब्द पाळायला समाज कमी पडला नाही. त्यांचेच शब्द होते, तेच पाळत नाहीयेत. त्यानीच लिहिलेलं आहे, आम्हाला कशाला खोट ठरवतील. घोषणा मोठी झाली, घराला दरवाजा दिला, मात्र कडी कोंडा दिला नाही. १०० टक्के यात मार्ग निघेल. कायद्याच्या चौकटीत जे बसतेय तेच मागत आहोत. पुढील आंदोलनाचे २४ ला बघू, ते सरकारच्या हातात असल्याचं, जरांगे म्हणाले.

# आक्षेपानंतर पुन्हा उद्या पोलीस पाटील आरक्षणाची सोडत

## लोकसंख्येनूसार आरक्षण काढले नसल्याचा आक्षेप

बीड : जिल्ह्यामध्ये पोलीस पाटील भरती प्रकिया राबवण्यात येणार असून त्यापूर्वी आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली होती. आरक्षणाच्या सोडतीनंतर काही ठिकाणी लोकसंख्येनूसार आरक्षण काढले नसल्याचा आक्षेप आल्यानंतर या बाबत जिल्हा प्रशासनाने दखल घेवून उद्या पुन्हा आरक्षणाची सोडत काढण्यात येणार आहे. बीड तहसिलमध्ये दुपारी २.३० वाजता बीड,गेवराई, शिरुर कासार या तिन तालुक्याचे आरक्षण काढण्यात येणार आहे.

गृहविभागाच्यावतीने राज्यातील पोलीस पाटील पदाची भरती प्रकिया राबवण्यात येणार आहे. भरतीपूर्वी ७ डिसेंबर रोजी जिल्ह्यात आरक्षणाची सोडत घोषीत करण्यात आली होती. आरक्षण काढल्यानंतर काही ठिकाणी




आक्षेप नोंदवण्यात आले होते. लोकसंख्येच्या आधारे आरक्षण सोडत झाली नसल्याचया तक्रारी आल्यानंतर याची दखल जिल्हा प्रशासनाने घेतली. व उद्या पुन्हा २२/१२/२०२३ रोजी आरक्षण सोडत प्रकिया काढण्यात येणार आहे. बीडच्या तहसिल कार्यालयात दुपारी २.३० वाजता बीड, गेवराई आणि शिरुर का. या तीन तालुक्याचे आरक्षण काढण्यात येणार असल्याचे उपविभागीय अधिकारी करिश्मा नायर यांनी म्हटले आहे.

# वारे परिवर्तनाचे... ध्यास प्रगतीचा... ध्यास विकासाचा... कहो दिल से... जयदत्त अण्णा फिरसे से....

बीड ।प्रतिनिधी

विधानसभा मतदारसंघात यंदा परिवर्तनाचे वारे वाहत आहे.बीड विधानसभा निवडणुकीत आपल्याला आपल्या हक्काचा माणूस जिंकून आणायचा आहे. हे आव्हान पेलण्यासाठी आता तळागाळातील कार्यकर्ता जोमाने कामाला लागलेला आहे. आण्णा साहेबांनी केलेल्या विकास कामांच्या जोरावर तळागाळातील मतदारापर्यंत जाण्यासाठी सर्वांनी आता प्रयत्नाची शिकस्त करण्याची गरज आहे. अण्णा साहेबांच्या विचारांची विकासाची शिदोरी आपण घराघरात पोहोचली पाहिजे. प्रत्येक घटकातील सामाजिक राजकीय शैक्षणिक क्षेत्रातील तरुणांना युवकांना संघटित करण्याची गरज आहे. अण्णा साहेबांच्या प्रत्येक कार्यकर्त्यांना हे काम करावं लागणार आहे. बीड मतदार संघातून साहेबांना जिंकण्यासाठी आपल्या एकमताने हे काम करावे लागेल. यापूर्वी विधानसभा निवडणूक आपण लढलो. त्यावेळी झालेल्या चुका यंदा करायच्या



नाहीत.विविध घटकातील लोक आपल्यासोबत घेऊन आता पुढे जावं लागेल. बीड मतदार संघातील सर्व समीकरणे जुळवून व गणित आपल्याला बसवायचे आहे. अन् साहेबांना महाराष्ट्र राज्यांच्या सार्वभौम सभागृहामध्ये पाठवायचे आहे.राज्यात कधीही निवडणूक लागू शकतात.त्यामुळ परिवर्तनासाठी आपल्याला सज्ज राहायचे आहे.दरम्यान सध्यांच्या राजकीय परिस्थितीवर अवलंबून न राहता छत्रपती शिवाजी महाराज शिव शाहू फुले डॉ बाबासाहेब आंबेडकर स्व काकू यांचा विचार पुढे घेऊन जावं लागेल. आज बीड मतदार संघात काय परिस्थिती आहे. हुकूमशाही पद्धतीने निवडणुका जिंकता येत नाहीत. आता अशा चुकीच्या गोष्टी लोकांना पटत नाहीत. त्यामुळे नक्कीच सत्ताधाऱ्यांच्या मतांमध्ये मोठ्या प्रमाणात घट होईल असा विश्वास आहे. आता हुकूमशाहीची परिस्थिती राहीलेली नाही.आपण चांगलं तन मन धन लावून प्रयत्न केला तर हा मतदारसंघ आरामात जिंकू शकतो. आपल्याकडे सात आठ महिन्यांचा काळ आहे. आपले कार्यकर्ते. बुथ कमिटी सक्षम करुन प्रत्येक बुथवर यश संपादन करायचं ध्येय बाळगून कामाला लागू या.......!!आणि बीड विधानसभा मतदारसंघ मोठ्या मताधिक्याने जिंकूया.....!! कहो दिल से... अण्णासाहेब फिर से वारे परिवर्तनाचे ध्यास प्रगतीचा. श्री बहिर भारत दामोधर. कार्यकर्ता साहेबांच्या विचारांचा.

## लिंबागणेश येथे मध्यरात्री लागलेल्या आगीत शुज सेंटर आणि कॅफे सेंटर जळुन खाक



### लाखोंचे नुकसान, पेट्रोल टाकून पेट्रोलचा संशय

लिंबागणेश ।प्रतिनिधी

दि.२१ मध्यरात्री साडे बारा वाजण्याच्या सुमारास लिंबागणेश बसस्थानक स्थित चंद्रकांत आवसरे यांचे श्री गणेश शुज सेंटर आणि औदुंबर नाईकवाडे यांचे ईश्वरभारती कॅफे सेंटर जळुन खाक झाले असुन पेट्रोल टाकून जाळण्यात आल्याचा संशय दुकानदारांनी व्यक्त केला असुन मध्यरात्री नेकनुर पोलिस स्टेशनचे सपोनि विलास हजारे व त्यांच्या पथकाने घटनास्थळी भेट दिली असुन तपास सुरू आहे.

दि.२१ मध्यरात्री मध्यरात्री साडे बारा वाजता लिंबागणेश बसस्थानक स्थित चंद्रकांत आवसरे यांचे श्री गणेश शुज सेंटर दुकान असुन मध्यरात्री लागलेल्या आगीत दुकान जळुन खाक झाले असुन अंदाजे ४ लाख रुपयांचे नुकसान झाले असल्याचे आवसरे यांचे म्हणणे आहे.याच वेळी औदुंबर नाईकवाडे यांचे शेजारीच ईश्वरभारती कॅफे सेंटर दुकानातील हजार लिटरचे २डिप फ्रीज,एसी फ्रीज, कुलर,आणि फर्निचर आदि एकुण ३ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.औदुंबर नाईकवाडे आणि चंद्रकांत आवसरे या दोन्ही दुकानदारांनी झालेली दुर्घटना शॉर्ट सर्किट ने झालेली नसून जाणीवपूर्वक कोणीतरी पेट्रोल टाकून जाळले असा संशय व्यक्त केला आहे.

# अंत्यविधी करायचा कोठे ? ; मृतदेह ग्रामपंचायसमोर ठेवून नातेवाईकांचा ठिय्या

## सुशी (वडगाव) येथे चार तासानंतर प्रशासनाने जागा उपलब्ध करुन दिल्यानंतर अंत्यसंस्कार

गेवराई : प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील सुशी (वडगाव) गावात स्मशानभूमीसाठी जागा नसल्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला. गुरूवारी एका ६० वर्षीय भूमीहीन व्यक्तीचे ह्दयविकाराने निधन झाल्यानंतर अंत्यसंस्कार कोठे करायचे, म्हणत नातेवाईक व ग्रामस्थांनी चक्क ग्रामपंचायत कार्यालयासमोर सदरील मयत व्यक्तीचा मृतदेह ठेवून ठिय्या मांडला. यानंतर प्रशासकीय अधिकाऱ्यांची चांगलीच धांदल उडाली. तब्बल चार तासानंतर या अधिकाऱ्यांनी गावालगत असलेल्या गावठाणची जागा उपलब्ध करुन दिल्यानंतर अंत्यसंस्कार करण्यात आले.

गेवराई तालुक्यातील सुशी (वडगांव) येथे स्मशानभूमी नाही. त्यातच गावालगत गावठाण जागा असताना देखील गावातील काही जणांकडून विरोध होत असल्याने अंत्यविधीसाठी नातेवाईकांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. दरम्यान गुरूवारी या गावातील तुळशीराम




आश्रुबा कनेढोण या व्यक्तीचा ह्दयविकाराने मृत्यु झाला. मयत कनेढोण हे भूमीहीन असल्याने अंत्यविधीसाठी जागा नाही.

गावालगत शासनाची गावठाण जमीन असताना गावातील काही लोकांच्या विरोधामुळे याठिकाणी अंत्यसंस्कार करता येईनात म्हणून अंत्यसंस्कार करायचा कोठे ? असा प्रश्न नातेवाईक व ग्रामस्थांना पडला. त्यामुळे मयत तुळशीराम कनेढोण यांचा मृतदेह थेट गावातील ग्रामपंचायत कार्यालयासमोर मांडण्यात आला, यामुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. याची माहिती मिळताच नायब तहसीलदार एस.बी.कुटे, मंडळ अधिकारी व्ही.व्ही. अंमलेकर, तलाठी बी.एस.सोन्नर, ग्रामसेवक राजेंद्र बन, विस्तार अधिकारी एस.बी.गायकवाड, आर.बी.उनवणे तसेच गेवराई पोलिस यांनी गावात धाव घेऊन तेथील नातेवाईकांशी चर्चा केली. यानंतर या प्रशासकीय अधिकारी यांनी गावालगत असलेल्या गावठाण जमीनीवर जागा उपलब्ध करुन दिली, तसेच या जागेवर स्मशानभूमी करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर नातेवाईकांकडून अंत्यसंस्कार करण्यात आले.

## बोगस केंद्रप्रमुख पदोन्नतीची चौकशी करुन संबंधीतावर कडक कारवाई करणेबाबत




वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, धारुर व केज तालुक्यातील एकूण ८ केंद्रप्रमुख नामे १) सय्यद हकीम कट्टमियों, २) गडदे व्यंकटेश केरबा, ३) कांबळे राधाकृष्ण सोपान, ४) शिंदे गंगाधर विश्वनाथ, ५) श्री.गांधले रामहरी अंतराम, ६) कोकणे दत्तात्रय भैरु, ७) चौरे संजय बाबुराव, ८) बोराडे अर्जुन बाबासाहेब हे सर्व केंद्रप्रमुख हे सेवाजेष्ठ नसताना तसेच त्यांची शैक्षणिक पात्रता देखील नसताना यांनी जेष्ठ शिक्षकांना ढावलून पदोन्नती मिळवली व शासनाकडून लाखो रुपयांची बिले उचलली आहेत. आम्ही यापुर्वी दि.२६/१०/२०२३ रोजी वरील विषयी कारवाई करणेबाबत अर्ज दिला होता. मात्र आपल्या विभागामार्फत तसेच शिक्षणाधिकारी (प्रा.) यांच्या मार्फत कुठलीही ठोस कारवाई केलेली दिसून येत नसल्याने आम्ही उपोषणास बसण्या संदर्भात पत्र दिले होते. मात्र काही अडचणी अनुषंगाने उपोषण दिनांक पुढे ढकलला दि.०५ जानेवारी २०२४ रोजी उपोषणास बसणार आहोत.

तरी संबंधीत बोगस केंद्रप्रमुखाच्या कागदपत्राची तपासणी करुन त्यानी उचलल्या लाखो रुपयाची त्यांच्याकडून वसूली करुन संबंधीताना सेवेतून तात्काळ निलंबीत करुन त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत ही नम्र विनंती.

# अकरा लाखाच्या दगडी दरवाजाने कालिका देवी मंदिराच्या ऐश्वर्यात भर !

## दरवाजाबरोबर तटबंदीचेही काम केले जाणार !

शिरूर कासार (प्रशांत बाफना)

कालिका देवी आणि सिध्देश्वराचे अधिष्ठान लाभलेल्या शिरूरशहरात आता कालिका देवी मंदिराचा मुख्य दरवाजा भव्यस्वरूपात दगडी होऊ घातल्याने संस्थानच्या ऐश्वर्याची आणखी उंची वाढणार असुन दरवाजाबरोबर तटबंदी देखील दगडीच होणार असल्याची माहिती संस्थानच्या सुत्राकडून देण्यात आली .सिध्देश्वर व कालिका मंदिर हे समकालिन किमान आठशे तेहजार वर्षापुर्वीचे हेमाडपंथीमंदिर सिंदफना नदीकाठी असुन दोन्हीही श्रध्दास्थानाचा उत्कर्ष दिवसेदिवस वाढू लागला आहे ,सिध्देश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानद शास्त्री यांचे मार्गदर्शनाखाली तर कालिका देवी मंदिराचा विकास विश्वस्थाच्या परिश्रमातून आणि लोकसहभागातून होत आहे .

कालिका देवी मंदिराचे पुर्व प्रवेशद्वार जुनाट झाले होते शिवाय देवीची पालखी बाहेर घेतांना त्रासदायक ठरत होते यावर मार्ग काढण्यासाठी नव्याने भव्य उंची रूंदीचा दगडी दरवाजा बांधण्याचा निर्णय विश्वस्थाकडून घेण्यात आला आणि आता त्या कामाला गती देखील मिळाली ,जुना दरवाजा व भिंती श्रमदानातून उतरवण्यात आल्या ,कुशल दगडी कारागिरामार्फत हे काम केले जाणार आहे ,दगडी भव्य दिपमाळीला साजेसा असा उंच रूद दगडी महाद्वार झाल्यानंतर संस्थानच्या ऐश्वर्याची ऊंची देखील वाढणार आहे .

सात फुट रूंद व सतरा फुट ऊंच या प्रमाणे पुर्ण दगडी काम होणार असुन दगड नेवासा येथून आणला जाणार आहे ,कुशल कारागिरामार्फत नक्षीकाम होणार असुन जवळपास अकरा लाखाचा खर्च अपेक्षीत असल्याचे संस्थान विश्वस्थ अध्यक्ष रोहीदास पाटील व सचिव बापुराव गाडेकर यांनी सांगितले .लोकसहभागातून हे काम होणार असुन वेळोवेळी भाविकातून सहकार्याचे हात पुढे येत असतात याही कामात आपला काहिसा वाटा असावा त्यादृष्टीने सहकार्य करण्याचे आवाहन विश्वस्थाकडून केले आहे .



# महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी केला करोडोंचा भ्रष्टाचार

## भ्रष्टाचार करनाऱ्या अधिकऱ्यांना निलंबित करून त्यांच्याविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करा :- पप्पु गायकवाड

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील महिला व बालविकास प्रकल्प कार्यालय १ व २ यांनी केला पोषण आहारामधील वस्तु निकृष्ट दर्जाच्या वाटप करून करोडोंचा भ्रष्टाचार केला आहे. सदरील भ्रष्टाचार करनाऱ्या अधिकरी, कर्मचारी यांची चौकशी करुन भ्रष्टाचार करनाऱ्या अधिकरी कर्मचाऱ्यांना निलंबित करून त्यांच्याविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करा अशी मागणी पप्पु गायकवाड यांनी मा. जिल्हाधिकारी बीड व मा. मुख्याधिकारी जिल्हा परिषद बीड यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

सविस्तर वृत्त असे की महिला व बालविकास प्रकल्प कार्यालय १ व २ मधील मुख्यसेविका १ व मुख्यसेविका २ या वरिष्ठ अधिकारी यांच्या अशिर्वादाने सर्रास अवैध मार्गाने, दादागिरी, हुकुमशाही करत गोरगरीब, वंचीत घटकांना पोषण आहार वाटप करण्यासाठी दिलेल्या मालाची विक्री करुन तसेच काहींना निकृष्ट दर्जाचा माल पुरवठा करुन लाखो - करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करत आहेत. सदरील अधिकारी अंगणवाडीवर माल पोहचला की नाही किंवा दर्जेदार आहे की निकृष्ट याची पाहणी करत नसून यांच्या मोबाईलचे लोकेशन व सीडीआर काढल्यास सर्व पुरावे हाती लागतील.



सदरील भ्रष्टाचार अंगणवाडी सेविका, सुपरवायझर व काही वरिष्ठ अधिकारी हे संगणमताने करत आहेत तसेच या मध्ये मुंडे व केकान देखील सामिल आहेत. सर्व नोंदी खोटया केल्या जातात, पोषण आहार ट्रॅकर ऑफ मधे अंदाजे खोटी माहिती भरवली जाते, तसेच घरपोच पोषण आहारात ८ पुड्याऐवजी ३ ते ४ पुडे देऊन संबंधीत गरीब लाभार्थ्यांच्या सह्या घेतल्या जातात. जिल्हा कार्यक्रम अधिकारी अत्तापर्यंत कधीच गेवराई तालुका प्रकल्प १ व २ यांच्या कार्यालयाला भेटले नाहीत ना कधी विचारपूस केली. शिपाई, अंगणवाडी सेविका, सुपरवायझर, प्रकल्प अधिकारी १ व २ व कर्मचारी संगणमताने करोडोंचा भ्रष्टाचार करत असल्याने गेवराई तालुक्यातील मुले कुपोशीत होऊ शकतात. पोषण आहारासह अंगणवाडी सेविका भरतीसाठी प्रत्येक १ लक्ष रुपये अधिकारी कर्मचाऱ्यांमार्फत घेत असल्याची तक्रार आली आहे, यामुळे अंगणवाडी सेविका भरती मध्ये देखील मोठ्या प्रमाणात करोडोंचा भ्रष्टाचार झाला आहे. पोषण आहार व अंगणवाडी सेविका भर्ती मध्ये भ्रष्टाचार करनाऱ्या शिपायापासून, प्रकल्प अधिकारी १ व २ तसेच जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांचे मोबाईल लोकेशन, सीडीआर व संपत्तीची चौकशी करुन त्यांना निलंबित करून त्यांच्याविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत.

यापूर्वी नियमबाह्य पोषण आहार उचलल्या प्रकरणी प्रकल्प १ च्या मुख्यसेविका एम. के. स्वामी व घोलप यांना निलंबित करण्यात आले होते, तरी देखील त्या याच ठीकाणी पुन्हा कारभार पहात आहेत. महिला बालविकास या खात्यातील अनेक कर्मचारी, अधिकारी मागील पाच वर्षाहून अधिक कालावधी पासून एकाच ठिकाणी खुर्चीला गोचीडासारखे चिटकून आहेत त्यांची तात्काळ बदली करण्यात यावी. भ्रष्टाचारी कर्मचारी व अधिकारी यांची वरिष्ठ अधिकारी यांच्या समीती मार्फत चौकशी करुन निलंबित केले नाही तर शासकिय कामात दिरंगाई करने याची याचीका कोर्टात दाखल करुन न्यायालयीन मार्गाने भ्रष्टाचारी कर्मचारी, अधिकाऱ्यांसह वरिष्ठ अधिकारी यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल. तसेच गेवराई पंचायत समिती समोर लोकशाही मार्गाने धरणे आंदोलन केले जाईल अशा अशयाचे निवेदन मा. जिल्हाधिकारी बीड व मा. मुख्याधिकारी जिल्हा परिषद बीड यांना दिले असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुका अध्यक्ष पप्पु गायकवाड यांनी दिली.

# सामाजिक कार्याचा उद्देश पैसे मिळवणे नव्हे - डॉ. गणेश ढवळे




**प्रतिनिधी / पाटोदा**

**सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना समाजाकडून मान-सन्मान निश्चित मिळत असतो परंतु सामाजिक कार्याच्या उद्देश पैसा मिळवणे असू शकत नाही म्हणून सामाजिक कार्यासाठी पुढे येणाऱ्यांनी निस्वार्थीपणे कार्य केले पाहिजे असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या कर्मचारी कल्याण समिती व लोकप्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी आयोजित उद्बोधनपर व्याख्यानात ते अतिथी व्याख्याता म्हणून बोलत होते.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. गणेश पाचकोरे, डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण उपस्थित होते.'माहितीचा अधिकार व सामाजिक कार्य' या विषयावर आयोजित व्याख्यानात डॉ. गणेश ढवळे यांनी माहितीचा अधिकार याविषयी विस्तृत मार्गदर्शन केले. माहितीचे प्रकार स्पष्ट करत व माहिती मागविण्याचा अर्ज कसा भरावा तसेच अपेक्षित माहिती प्राप्त करण्यासाठी अपिलीय अधिकारी ते खंडपीठापर्यंत कशी दाद मागता येते याविषयी त्यांनी सविस्तर विश्लेषण केले. याप्रसंगी त्यांनी सामाजिक कार्यातील व विविध चळवळींमधील स्वानुभव व्यक्त केले. त्यानंतर त्यांनी उपस्थितांच्या प्रश्नांची उत्तरे देत व शंकानिरसन करत सुसंवाद साधला.अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे म्हणाले की सामाजिक कार्याची सुरुवात आधी स्वतःपासून होणे गरजेचे असते, संघटन हे हळूहळू घडून येते व पुढे त्याला चळवळीचे स्वरूप प्राप्त होत असते.सूत्रसंचालन प्रोफेसर प्रशांत पाटील यांनी केले. अतिथींचा परिचय प्रा. शरद पवार यांनी करून दिला. आभारप्रदर्शन डॉ. कुशाबा साळुंके यांनी केले. कार्यक्रमास प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# युवा नेते संदीप उबाळे यांच्या वाढदिवसानिमित्त ५१ युवकाचे रक्तदान केले




## अन्नदान व रक्तदान हेच श्रेष्ठ दान : संदीप उबाळे

बीड ।प्रतिनिधी

दि.२० डिसेंबर प्रतीवर्षी प्रमाने याहि वर्षी बीड शहरातील शिवाजी नगर भागातील युवा नेते संदीप उबाळे यांनी रक्तदान करून मित्र परिवारा सोबत आपला वाढदिवस केला साजरा. बीड शासकीय रुग्णालयात रक्ताचा तुटवडा असल्याने युवकांनी रक्तसाठी पुढे येत गरजु गरीब रुग्णाना रक्तबॅग मिळण्यासाठी खुप अडचणीचा सामान करावा लागतो म्हणून स्वतः समाजसेवा संदीप उबाळे यांनी वाढदिवसादिवशी रक्तदान करून समजापुढे ऐक नवा आदर्श निर्माण केला आहे.

संदीप उबाळे हें सतत गरजूना मदन करण्यासाठी व गोरगरीबांच्या असे अडीअडचण सोडवणारा, गरीबासाठी धडपडनारा म्हणून त्यानंची शहरात त्याची ओळख निर्माण झाली आहे..कोरोना सारख्या महाभयंकर रोगात त्यानी अनेक गरजूना,रस्त्यावर फिरणाऱ्या,पालावर असणाऱ्या,पोलीस कर्मचारी यांनी ड्युटीच्या जागी डबा पोहच केला होता,गरीब लोकांना धान्य,जेवण डबा देऊन मानवधर्म निभावला होता.मदत करण्याचा मानस मनात ठेवून इतर अन्नदान देण्यासह ते रक्त दान देण्यासाठी ते कधीही आग्रही असतात.या आधी त्यानी बऱ्याच रुग्णांना रक्तबॅग मिळवून दिल्या आहेत. दरवर्षी रक्तदान करून ते आपला वाढदिवसा साजरा करत असतात.परंतु कोरोना असल्याने गेल्या दोन वर्ष शक्य झाले नव्हते.या वर्षी मोठया जोशात,उत्सही वातावरनात मित्रपरिवार यांनी रक्तदान करून आपल्या युवानेत्यांचा वाढदिवस साजरा केला.संदीप उबाळे यांनचा मित्रपरिवार,नातेवाईक,डॉक्टर,वकील, व्यांपारी यांनी मित्रनगर चौकात रक्तदान शिबीराच्या स्थळी भेटून शुभेच्छाचा वर्षाव केला. आज वाढदिवसाच्या दिनी रक्तदान करून ते रक्त एखाद्याला जीवनदान देईल ते रक्त गरजू रुग्णाच्या कमी येईल यातून कोणाचं तरी जीव वाचेल हेच ध्येयमनात बाळगून रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते.यावेळी विनोद मुळूक,स्वप्निल गलधर उल्हास(भैय्या)गिराम,सुधीर भांडवले,विजय लव्हाळे, सचिन पवार,युवा नेते सनी आठवले,महेश अण्णा आठवले,बंटी शेठ धनवे किशोर भैय्या पिंगळे शुभम कवडे गणेश थोरात दिनेश देंगे बापू भैरवाल व मित्र परिवार उपिस्थित होता.

# सामाजिक प्रश्नांसाठी आणि समाजहितासाठी अखेर लेखणी आमरण उपोषणाला

## रखडलेल्या राष्ट्रीय महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करा यासह ईतर मागण्यांसाठी संपादक अजय भांगे यांचे बेमुदत आमरण उपोषण सुरु!



केज ।प्रतिनिधी

मांजरसुबा ते धायगुडा पिंपळा या राष्ट्रीय महामार्गाचे मजबुतीकरण करण्यासाठी महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाने सिमेंट कॉंक्रिट करून रस्त्याचे मजबुती करणाचे काम क्ष्झच् कंपनीला देण्यात आले. या रस्त्याची गुणवत्ता तपासण्यासाठी तथा देखरेख करण्यासाठी छझएउ कंपनीव्दारे रवि कुमार यांची नेमणुक करण्यात आली . क्ष्झच् कंपनी हि पाठीमागील ३ वर्षापासुन अतिशय संथ गतीने काम करत आहे . तसेच रस्ता सुरु करण्या अगोदरच सदरील रस्त्याच्या कामामध्ये स्टीलचा वापर न केल्यामुळे रस्त्याला कोरेगाव , चंदनसावरगाव , डिघोळअंबा केज पाण्याच्या टाकीसमोर , आमदार निवासाच्या समोर अंबाजोगाई , घाटनांदूर ,धायगुडा पिंपळासह आदि. ठिकाणी जागोजागी तडे, भेगा, चिरा जाऊन रस्ता खचल्यामुळे मोठ्या प्रमाणात आपघात होऊन कित्येकांना आपला जिव गमवावा लागला आहे. त्या बरोबरच रस्ता करण्या अगोदर रस्त्याच्या कडेला असंख्य झाडांची कत्तल करण्यात आली होती. परंतु आद्यापपर्यंत एकही रोपटे रोडच्या कडेला लावण्यात आलेले नाही. तसेच रस्त्याची गुणवत्ता तपासण्यासाठी नेमण्यात आलेले रवि कुमार यांच्या ढिसाळ कारभारामुळे रस्त्यालगत असलेल्या गावांकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम निकृष्ट पद्धतीने झाले असुन यामुळे राष्ट्रीय महामार्गावर तथा गावांकडे जाणाऱ्या निकृष्ट रस्त्यामुळे भविष्यात आपघात होऊन जिवीतहानी होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. सदरील रस्त्याच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून तो यापुढेही सुरुच आहे. विशेष म्हणजे रस्त्याची गुणवत्ता तपासण्यासाठी ज्या छझएउ कंपनीचे रवि कुमार यांची नेमणुक केली होती. ते रवि कुमार अंबाजोगाई येथील ४ महिन्यापुर्वीच ऑफीस बंद करून फरार झाले आहेत . सदरील रस्त्याची गुणवत्ता न तपासताच क्ष्झच् कंपनीचे गुत्तेदार देवळे भष्टाचार युक्त राष्ट्रिय महामार्गाचे काम संथ गतीने करत आहेत. होत असलेल्या या कामाचे करोडो रुपयांची बिले काढले जात आहेत.

त्यामध्ये औरंगाबाद येथील कांही कर्मचाऱ्यांना हाताशी धरुन बिले काढली जात आहेत. तसेच छझएउ चे ऑफीस ४ महिन्यापासुनी बंद आहे. तर मग रस्त्याची गुणवत्ता न तपासताच करोडो रुपयांची बिले कोण काढत आहे ? जर एकही कर्मचारी तेथे हाजर नाही. तर त्यांची लाखो रुपयांची पगार बीले कसे निघतात ?यावर महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ मुंबई, औरंगाबाद यांनी छझएउ कन्सल्टन्सी प्रायव्हेट लिमिटेड. ची व मुख्याधिकारी रवि कुमार ,क्ष्झच् कंपनीचे गुत्तेदार देवळे यांची तात्काळ विभागीय चौकशी करावी. तसेच छझएउ कन्सल्टन्सी प्रायव्हेट लिमिटेड हि कंपनी महाराष्ट्रामध्ये ब्लॅक लिस्ट मध्ये टाकावी तसेच जे महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ औरंगाबाद येथील कर्मचारी यामध्ये सामील आहेत. मी याबाबत मागील कित्येक दिवसापासुन प्रशासनाच्या लक्षात आणुन देऊन पाठपुरावा करत आहे.

मात्र संबधितावर कसल्याच प्रकारे कारवाई होत नाही. वरिल बाबीची आपण तात्काळ दखल घ्यावी. व संबधीतावर कठोर कायदेशीर कारवाई करावी यासाठी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ बीडचे जिल्हा अध्यक्ष तथा दै.वादळ वार्ताचे मुख्य संपादक मा.अजय भांगे यांनी दि. २०/१२/२०२३ बुधवार रोजी केज तहसिलदार कार्यालया समोर सकाळी ११ वाजल्यापासुन बेमुदत आमरण उपोषण सुरु केले आहे. या उपोषणाला केज तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवानचा तसेच महिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे पदाधिकारी जिल्हा सरचिटणीस मुबाशीर खतीब, केज तालुकाध्यक्ष रमेश गुळभिले , मुख्य प्रचार प्रमुख दशरथ चौरे, प्रचार प्रमुख प्रेमजीत हजारे , तालुका सहसचिव देवानंद खरात , विलास पोवळे यांनी जाहिर पाठींबा दिला असुन संपादक अजय भांगे यांच्या सोबत सर्व पत्रकार बांधव सोबत असल्याचे पत्रकारांच्या एकजुटीवर दिसुन आले तसेच जोपर्यंत मागण्या मान्य होणार नाहीत

# थोर समाजसुधारक संत गाडगे महाराज यांचे विचार समाजाला प्रेरणादायी प्राचार्य दहिफळे

शिरूर कासार (प्रशांत बाफना)

थोर समाज सुधारक अंधश्रद्धा अस्वच्छता व अनिष्ट रूढी परंपरा यांचे उच्चाटन करणारे थोर संत समाज सुधारक गाडगे महाराज यांचे विचार आज समाजाला प्रेरणादायी ठरत असल्याचे मत प्राचार्य अंगदराव दहिफळे यांनी पुण्यतिथी कार्यक्रमात व्यक्त केले पाडळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळी तालुका शिरूर कासार येथे संत गाडगे महाराज यांच्या पुण्यतिथीचे मोठ्या प्रमाणात आयोजन करण्यात आले होते सर्वप्रथम संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन प्राचार्य दहिफळे यांच्या हस्ते करण्यात आले त्या नंतर सर्व कर्मचारी वृंद यांनी प्रतिमेला अभिवादन केले या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य दहिफळे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उच्च माध्यमिक पर्यवेक्षक भाऊसाहेब सोंडगे माध्यमिक पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण जेष्ठ शिक्षक विश्वनाथ घरगिने रामराव देशपांडे आदींची उपस्थिती होती कार्यक्रम प्रसंगी पुढे बोलताना प्राचार्यदहिफळे म्हणाले की संत गाडगे महाराजांनी दिन दुबळे अनाथ लोकांची फार मोठ्या प्रमाणात सेवा केली भजन कीर्तन करून स्वच्छता दूत म्हणून त्यांनी मोठी भूमिका निभावली यामध्ये त्यांनी अस्वच्छता विषयी समाजामध्ये लोक जागृती करून शहरातव गावोगावी स्वच्छता मोहीम राबवून लोकांचे आरोग्य अबादीत ठेवले संत गाडगे महाराज यांचे हे कार्य समाजाला प्रेरणादायी ठरणार असल्याचे मत यात्रसंगी त्यांनी व्यक्त केले कार्यक्रम प्रसंगी सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मारुती धांडे यांनी केले तर आभार सुरेश घरगिने यांनी मानले.

# बीड येथे होणाऱ्या श्री मनोज जरांगे पाटील यांच्या इशारा सभेच्या अनुषंगाने शांतता कमीटीची बैठक संपन्न झाले संपन्न



आज रोजी जिल्हाधीकारी कार्यालय बीड येथे बीड जिल्हा पोलीस दलाचे वतीने आयोजीत केलेल्या शांतता कमीटीच्या बैठकीस बीड जिल्ह्यातील सर्व जातीधर्मातील प्रतीष्ठीत नागरीक, शांतता कमीटीचे सदस्य, बीड सकल मराठा मोर्च्यांचे पदाधीकारी, सर्व राजकीय पक्षाचे पदाधिकारी उपस्थीत होते. सदर शांतता कमीटीच्या बेटकीत पोलीस अधीक्षक. बीड यांनी जनतेस जातीय सलोखा राखत जिल्ह्यामध्ये कायदा व सुव्यवस्था अवाधीत ठेवण्याचे व समाजकंटकांकडून काही उपद्रवी कारावाया होण्याचे संकेत निदर्शनास आल्यास या बाबत नागरीकांनी जागरुक राहून पोलीसांना तात्काळ माहीती देणेबाबत आवाहन केले आहे.

तसेच सदर बैठकीस उपस्थीत सकल मराठा मोर्चाचे पदाधीकारी, भटक्या विमुक्त जातीच्या संघटनेचे अध्यक्ष, इ.मा.व. संघटनेचे पदाधीकारी, बीड अ.जा. संघाचे अध्यक्ष, स्वाभीमान संघटनेचे अध्यक्ष तसेच अल्पसंख्यांक संघटनेचे नेते, विवीध पक्षाचे नेते यांनी सर्वांनी बैठकी मध्ये संवाद साधताना, श्री. मनोज जरांगे पाटील यांचे दिनांक २३/१२/२०२३ रोजी होनाऱ्या इशारा सभेच्या अनुषंगाने व त्यानंतर जील्ह्यामध्ये शांतता भंग होनार नाही तसेच जिल्ह्यातील सामाजीक सलोखा अबाधीत राहील, तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उदभवनार नाही याची ग्वाही दिली आहे.

# मानवी मनाच्या विद्रोहाचा संवेदनशील लेखक- प्रा. डॉ. भास्कर बडे

गोमळवाडा येथे संत भागवत बाबा साहित्य नगरीत होत असलेल्या एकता साहित्य संमेलन अध्यक्ष प्रा.डॉ.भास्कर भुजंगराव बडे यांचे मनापासून अभिनंदन.या निमित्ताने त्यांच्या साहित्याचा मागोवा घेण्याचा अल्पसा प्रयत्न.प्रवाहाच्या विरुद्ध पोहणार्या माणसांना वास्तव जीवनात भयानक संघर्ष करावा लागतो.त्यांचे विचार आणि लेखन जरी समाजाच्या वास्तवासी निगडित असले तरीही त्यांना प्रत्यक्ष जीवन जगताना यातना भोगाव्या लागतात. हाच अनुभव भास्कर बडे यांच्या वाट्याला आला.साहित्य लेखनाबरोबर आपला विद्रोही आणि संघर्षशील बाणा कायम ठेवला. संघर्षशील वृत्ती आयुष्यभर ज्या माणसांनी जोपासली त्या माणसांना सलाम. भास्कर बडे यांनी आपल्या लेखनातून कथा,कादंबरी,कविता ,नाटिका, एकांकिका ,चरित्र, प्रवास वर्णन,रिपोर्ताज,बाल साहित्य आदी वाङ्मय प्रकार असे वास्तव जीवनाचे चित्र करणारे साहित्य लेखन केले.एका लेखकाला गाव बंदी होते हे उघड सत्य त्यांच्या वाट्याला आले .

डॉ.भास्कर बडे यांनी १) वावर - १९८८ २ नवरा बायकोच्या-गप्पा १९९४, बरडाचं शेत-१९९४, चिकाळा - २००६आपल्या बापाच्या मातीत २००६ अंजीमाय-२०१० मातीवरची माणसे-२०९३ खिलाऱ्या - २०१३ खिलार्या,आणि इतर एकांकिका, संघर्षयात्री, - गोपीनाथ मुंडें......,.आदी.साहित्य प्रकारांत लेखन केले आहे.त्याच बरोबर कथा-कथनाचे प्रयोग मोठ्या प्रमाणात केले आहेत.भास्कर बडे यांचा पिंड हा ग्रामीण लेखकांचा असला तरीही दलित जाणिवा त्यांच्या लेखनात जाणवतात.तर संत वांग्मयाच्या जाणिवांची प्रगल्भता त्यांच्या लेखनात जाणवते. संघर्षशील सामाजिक कार्यकर्ते अशोक तांगडे व मनिषा तांगडे यांच्या संघर्षशील जीवनाचे ग्रामीण भागातील दाहक वास्तव जाणवते. कर्ज मंजुरीसाठी एसबीआय बँकेचा मॅनेजर खेड्यातील महिलेला पैशाची किंवा शारीरिक मागणी करतो तेव्हा चौथाळून उठलेली महिला शिरूरच्या भर चौकात चपलीने मारते हे विद्रोही अनुभवविश्व दलित साहित्यापेक्षा ग्रामीण साहित्यात भास्कर बडे यांनी मांडले आहे.खिलार्या या त्यांच्या लेखनातून शेतीमाती बद्दल असलेली शेतकऱ्याची ओढ जाणवते. जेव्हा खिलार्या शेतीची कामे करत होता. तेव्हा लक्ष्मी शेतकऱ्यांच्या दारात पाणी भरीत होती परंतु खिलार्याचे मरण शेतकऱ्यांना आपल्या घरातीलच व्यक्ती गेल्याचे दुःख रेखाटताना भास्कर बडे यांची लेखणी तितकीच संवेदनशील आणि तरल अनुभव रेखाटणारी दिसते.

शेतकऱ्यांनी आत्महत्येपासून दूर जावे त्याचा विचार शेतकर्याच्या डोक्यातही येऊ नये. नियोजनातून कष्ट केले तर आर्थिक सुबत्ता यायला वेळ लागत नाही ऐन तारुण्यात वैधव्य आलेल्या स्त्रीने जिद्दीने आपली मुले शिकविण्यासाठी एका शेळीच्या शंभर शेळ्या निर्माण केल्या.बकरे विक्री करुन मुले शिकवली.नौकरीलाही लावली.ही जिद्द शेतकर्यांनी आत्महत्येचा विचार मनात येण्या अगोदर अनुभवली तर अणेक शेतकर्यांचे प्राण वाचतील. निवृतीनंतर एखादा माणूस आपल्या वयाला कवटाळून घरात हरी हरी करत बसला असता, परंतु मुळातच बंडखोर वृत्तीचे असलेले कविवर्य डॉ. बडे सरांनी प्रत्यक्ष शेती करून त्यावर आधारित जिवंत अनुभव कथन करायचे ठरवले आहे. याचा परिपाक म्हणून बड़े सरांची लेखणी ही बीड जिल्ह्यासारख्या खडकाळ परिसरात शेतीमालीची कविता लिहून मोठ्या ताकदीने चालवत आहेत. सगळीकडे खडकाळ माळरान असतांना आपल्या शेतावर बड़े सर सफरचंदाची लागवड करुन महाराष्ट्रातील शेतकयांसमोर नवा आदर्श उभा करत आहेत.

अलीकडच्या तीन दशकाच्या कालखंडात मराठी साहित्य विश्वात डॉ. भास्कर बड़ेयांचे नांव मोठ्या सन्मानाने घेतले जाते.एक व्यासंगी कवी, नामवंत कथा लेखकापैकी बड़े हे एक नांव आहे. डॉ, बड़े हे केवळ कथा लेखक नसून आपल्या खुमासदार शैलीतून ते श्रोत्यांना आपल्या कथा कथनातून मंत्रमुग्ध करणारे व्यसगी व्याख्याता आहेत. डॉ बडे यांची कथा-कविता त्यांच्या शेतीमातीच्या जिवंत अनुभवातून प्रवास करतांना वाचकांना अंतर्मुख करते, जळपास दिड डझनपेक्षा जास्त पुस्तके डॉ. बड़े सरांच्या नावावर असून आत्तापर्यंत त्यांना वाङ्मयातील अनेक पुरस्कारांनी गौरविले आहे. लेखक या नात्याने डॉ. बड़े हे एकाच साहित्य प्रकारात बंदिस्त नसून त्यांनी कथा-कविता लेखनाबांचरस, कादंबरी, चरित्र ग्रंथ,: मुलाखत ग्रंथ, बाल साहित्य इत्यादी साहित्य प्रकार हाताळले असून समीक्षण आणि संपादन क्षेत्रातसुद्धा त्यांचे नाव सन्मानाने घेतले जाते. त्यांच्या १९८८ साली प्रकाशित झालेल्या वावर कविता संग्रहाने साहित्य क्षेत्रात खळबळ माजवली होती, शेतकर्यांच्या व्यथा वेदनांवर फुंकर घालून बाई ग धीट हो या कथेतील नव्या जगाची नवीन व्यवस्था यात धिटाईने उभी करतात येणान्वा पिढीला आधार देताना डॉ बड़े सातत्याने आपले काव्य लोकाभिमुख करत असतात. कवितेच्या प्रांगणात त्यांची कविता फुलून येताना त्यांची प्रामीण कथा सुध्दा खेडयापाडयात रमतांना दिसते त्यांचे 'पादर' 'चिकाळा' खिलार्या आपल्या बापाच्या मातीत' आणि 'बाईचा दगडहै कथासंग्रह आणि अंजीमाय ही बाल कादंबरी मराठी कथा-कादंबरी विश्वातआपली वेगळी ओळख करून आजही वाचकांच्या पसंतीस उतरताना दिसते.

शिरूर कासार सारख्या माळरानाच्या पट्ट्यात लोणी वारणी येथे जन्मलेल्या डॉ. बडेंना आपल्या घरातील, आणि भोव तालच्या ऊसतोड कामगाराच्या व्यथा वेदना खोलवर जात आहेत. यातून त्याच्या 'पानकणसं या कादंबरीने जन्म घेतला, उपेक्षित वंचित उसतोड कामगारांच्या व्यथा मांडताना डॉ.बडे आपल्या परिसराचे प्रतिनिधित्व करतांना आपल्या लेखणीतून आपल्या माय-मातीशी इमान राखले आहे. बाचबरोबर बीड जिल्ह्यात जन्मलेले राष्ट्रसंत श्री संत भगवानबाबा यांच्या शिकवणीने प्रभावित झालेल्या डॉ.बडेनी संत भगवानबाचा याचे पुरोगामी, शैक्षणिक कार्य विषद करणारे चरित्र लिहून आपल्या परिसराचा वसा समृद्ध केलेला आढळून येतो.

डॉ.भास्कर बडे हे आत्तापर्यंत अनेक पुरस्कारांनी सन्मानित झाले आहेत. त्यांच्या पाणकणस कादंबरीला के.भि.ग.रोहमारे आणि एकता साहित्य पुरस्कार, चिकाळा कथासंग्रहास राज्यस्तरीय साहित्य साधना पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. त्यांच्या अनेक कथा महाराष्ट्रातील विविध विद्यापीठाच्या बी.ए. आणि एम.ए, च्या अभ्यासक्रमात आहेत ही मोठी गौरवपूर्ण बाब म्हणावी लागेलडॉ . भास्कर बडे यांनी बावर प्रकाशनाच्या माध्यमातून नवोदित लेखकांना प्रकाशनाचे नवे दालन खुले करून नवीन ग्रंथ संपदा प्रकाशित केली आहे.यातून बीड जिल्ह्यासारख्या महानगरापासून कोसो दूर असलेल्या जिल्ह्यात साहित्यिकांची परंपरा निर्माण करण्याचे मोठे कार्य त्यांनी हाती घेतले आहे.या कार्यास खूप खूप शुभेच्छा

लेखक प्रोफेसर

**डॉ अशोक उत्तमराव घोळवे**

**संकलन**

प्रशांत बाफना

## निष्काम भाव असल्यासच परमेश्वर प्राप्ती - ह.भ.प. प्राची व्यास

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

ईश्वराची भक्ती निरपेक्ष भावनेने असावी व त्यास मानवाच्या अंगी सत्संग असावा लागतो तरच निष्काम भाव निर्माण होतो व मनुष्य जन्म सार्थकी लागतों असे मत डोंबिवली येथील प्रख्यात महिला किर्तनकार ह.भ.प. प्राची व्यास यांनी व्यक्त केले.त्या दत्तसंस्थान थोरले देवघर येथे आयोजित दत्त जयंती मार्गशीर्ष नवरात्र महोत्सवात दत्त भक्तीपर किर्तनात बोलत होत्या पुढे त्या म्हणाल्या की,सत्संगाच्या माध्यमातून परमेश्वराचा योग घडतो परंतु तो योग आयुष्यात यावा लागतो समाजात अधोगती निर्माण झाल्यास सत्संग आवश्यक आहे तो चांगल्या लोकांच्या संतत्वातुन होतो हे संत्सगाचे साधन जीवनात फार उपयोगी पडते म्हणून ते जवळ असावे लागते जीवन हे हरी चरणाशी लिन करावे मग ते सफल होवुन व दु:ख नाहीसे होण्यास मदत होईल मात्र परमेश्वराचे स्वरूप कळाले पाहिजे

असे सांगून कीर्तनाच्या उत्तररंगात रामकथा विषद केली प्रारंभी प्राची व्यास यांचे स्वागत सुमनताई हिवरेकर यांनी यांनी केले.हार्मोनिअमवर बी. के. पांडे व तबल्यासाठी सौरभ कुलकर्णी यांनी साथसंगत केली याप्रसंगी संस्थानधिपती समीर गोस्वामी यांच्यासह परीसरातील महिला,नागरिक भाविक भक्त उपस्थित होते.

## राष्ट्रीय विध्यार्थी संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी दिपक सातदिवे यांची निवड

अहमदनगर ।प्रतिनिधी

जिल्ह्याच्या शेवगाव तालुक्यातील दहिगाव ने येथील दिपक गोरक्षनाथ सातदिवे यांची राष्ट्रीय विध्यार्थी संघटनेच्या अहमदनगर जिल्हा अध्यक्ष पदी निवड करण्यात आले आहे. अहमदनगर जिल्हा कार्यकारिणीच्या जिल्हा अध्यक्ष पदी राष्ट्रीय विध्यार्थी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ड कपिलवृक्ष गोडघाटे (शाहु) यांनी नियुक्ती पत्र देऊन करण्यात आली. समाजाप्रती उत्कृष्ट राष्ट्रीय विध्यार्थी संघटनेच्या माध्यमातून सेवेच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय विध्यार्थी संघटनेच्या जिल्हाध्यक्ष पदाकरीता दिनांक १९/१२/२०२३ पासून नियुक्त करण्यात आले आहे. त्यांच्या या निवडीचे अहमदनगर जिल्ह्यातील सर्व विद्यार्थी तसेच मित्र परिवाराकडून शुभेच्छाचा वर्षाव होत आहे



## मुक्ताराम गवळी यांचें आज पो.नी.कदम यांच्या विरोधात आमरण उपोषण सुरू

### विविध पक्ष संघटनांचा पाठिंबा




परळी ।प्रतिनिधी

फिर्यादी सोबत तक्रार दाखल करण्यासाठी परळी ग्रामीण पोलीस स्टेशनला जाणारे सामाजिक कार्यकर्ते तथा इंजेगावचे माजी उपसरपंच मुक्ताराम गवळी यांचें आज पो.नि. हेमंत कदम यांच्यावर गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी परळी शहर पोलीस स्टेशन समोर आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. याबाबत दिनांक ७ डिसेंबर रोजी मुक्ताराम गवळी यांनी उपोषणा बाबत निवेदन दिले होते. निवेदनात पुढे म्हटले आहे की, दिनांक १९ ऑक्टोबर २०२३ रोजी फिर्यादी राहुल आश्रुबा झिंजुर्डे यांच्या शेतातील सोयाबीन चोरून नेणारा विरुद्ध तक्रार दाखल करण्यासाठी त्यांच्यासोबत परळी ग्रामीण स्टेशनला गेलो होतो. यावेळी तक्रार तब्बल सात ते आठ तास दाखल करून घेण्यात आली नाही.

रात्री ९ च्या दरम्यान पोलीस निरीक्षक हेमंत कदम हे ग्रामीण पोलीस स्टेशन मध्ये आले. त्यावेळी फिर्यादी राहुल झिंजुर्डे फिर्याद देत असतानाच हेमंत कदम यांनी मुक्ताराम गवळी यांना तू कोण, तुझी लायकी काय? माझ्यासमोर बसण्याचे तुझी लायकी नाही.असे म्हणत जातिवाचक शिवीगाळ करीत मारहाण केली. व पोलीस स्टेशनच्या बाहेर हाकलले. एवढ्यावरच न थांबता गोळ्या घालून जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी गवळी यांनी पोलिस महासंचालक औरंगाबाद, जिल्हा पोलिस अधीक्षक बीड, उपविभागीय पोलिस अधिकारी अंबाजोगाई यांना तक्रार केली.तसेच शहर पोलीस स्टेशन परळी येथे हेमंत कदम यांच्यावर मारहाणीचा गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी दिनांक ७डिसेंबर रोजी अर्ज दिला होता.

याप्रकरणी पोलिस महासंचालक औरंगाबाद, जिल्हा पोलिस अधीक्षक बीड, उपविभागीय पोलीस अधिकारी अंबाजोगाई, उपजिल्हाधिकारी कार्यालय परळी,शहर पोलीस स्टेशन परळी यांना निवेदन दिले.दिलेल्या अर्ज,निवेदनावर पोलीस प्रशासनाने कोणतीही कारवाई केली नाही म्हणून अखेर आज दिनांक २० डिसेंबर रोजी परळी शहर पोलीस स्टेशन समोर आमरण उपोषणाला सुरुवात केली. या उपोषणाला बौद्ध जन संघर्ष समितीचे भास्कर नाना रोडे,प्रा.दासू वाघमारे, मनसेचे तालुकाध्यक्ष श्रीकांत पाथरकर,माजी नगरसेवक रवी मुळे, शहराध्यक्ष वैजनाथ कळसकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर सचिव अनंत इंगळे, रिपाईचे शहराध्यक्ष शुभम इंगळे,धम्मपाल क्षिरसागर, राहूल घोबाळे, हनुमान कराड आदिंनी पाठिंबा दिला आहे.

## माजी आ.धोंडेच्या संकल्पनेतील

# ऐतिहासिक कृषी प्रदर्शनाचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा-शंकर देशमुख

आष्टी (प्रतिनिधी)

शेतकऱ्यांचे नेते माजी आ.भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतुन आष्टी, पाटोदा,शिरुर मतदार संघात प्रथमच होत असलेल्या कृषी प्रदर्शनाचा शेतकरी बांधवांनी भेट देऊन लाभ घ्यावा असे आवाहन बीड जिल्हा भाजप सरचिटणीस शंकर देशमुख यांनी केले आहे माजी आमदार शिक्षण महर्षि भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतुन,आष्टी येथील छत्रपती शाहू,फुले,आंबेडकर कृषी महाविद्यालयाच्यावतीने दि.२४ ते २७ डिसेंबर २०२३ या कालावधीतील चार दिवसीय डॉ.स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे.या कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन कृषीमंत्री धनंजय मुंडे,माजी मंत्री पंकजाताई मुंडे,कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल,मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.इंद्रमणी, पद्मभूषण पोपटराव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे.आज या राज्यस्तरीत कृषी प्रदर्शनाचे संपर्क कार्यालयाचे उद्घाटन झाले.या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात मोठ्या संख्येने शेतकऱ्यांना सहभाग लाभावा यासाठी कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी ,प्राध्यापक,शेतकरी, सर्व कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावा असे आवाहन शंकर देशमुख यांनी केले. यावेळी पुढे बोलताना देशमुख म्हणाले की,आष्टी येथे होणारे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन ..न भुतो न भविष्यती...होत आहे. हे कृषी प्रदर्शन चार दिवस आहे. कृषीविषयक प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी आनंदपर्वणी ठरणार आहे.शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन करीत कायम दुष्काळी तालुका म्हणून ओळख असणारा हा आष्टी तालुका आहे. या तालुक्यात कृषी प्रदर्शन घेण्याचे योग आपल्याला आला आहे.आष्टी शहरात दि.२४ ते २७ डिसेंबर २०२३ चार दिवस राज्यस्तरीय डॉ.स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे पहिल्यांदाच होत आहे .



या कृषी प्रदर्शनामध्ये छत्रपती शाहू,फुले,आंबेडकर कृषी महाविद्यालयातील उभारलेले उद्योग व त्यांचा अनुभवकथन करण्यासाठी उभारण्यात येणारी यशस्वी विद्यार्थी व्यावसायिकांची दालने या प्रदर्शनीचे आकर्षण ठरणार आहे.या कृषी प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण दोन कोटी किमंतीचा दीड टन वजनाचा रेडा असणार आहे.या प्रदर्शनात डेअरी तंत्रज्ञान,कृषी तंत्रज्ञान, सोलर शासकीय योजना,शेती अवजारे,बी-बियाणे,कुक्कुटपालन खते,सिंचन,पतपुरवठा,हरितगृह, खाऊ गल्ली,लहाण मुलांसाठी खेळ गल्ली यासह विविध कृषी पिकासंदर्भात तज्ञ मार्गदर्शक मार्गदर्शन करणार आहेत.

## गेवराई उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील मनमानी कारभार थांबवा

## अन्यथा लोकशाही मार्गाने अमरण उपोषण करू - सय्यद सलीम बापू

बीड / प्रतिनिधी

गेवराई उपाधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनमानी कारभार थांबवा अन्यथा लोकशाही मार्गाने अमरण उपोषण करून असे निवेदन आंबेडकर विचार मोर्चा तथा आंबेडकर रिपब्लिकन विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सलीम बापू यांनी जिल्हा भूमी अधिक्षक कार्यालय येथे दिले आहे.

असे की,गेवराई उपाधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनमानी कारभार सुरू आहे.तालुक्यातून अनेक शेतकऱ्यांच्या मोजणी,हद्द-खुणा,गुंठेवारी साठी अर्ज प्रलंबित असताना आर्थिक तरजोड शिवाय अधिकारी व कर्मचारी काम करायला तयार नाही. कार्यालयात नेते मंडळी भू माफिया यांच्याशी तडजोड करून त्यांची कामे लवकर होतात पण कार्यालयात सर्वसामान्यांचे अर्ज जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवले जाते सर्वसामान्यांनी तात्काळ मोजणीची फीस भरून सुद्धा त्यांची मोजणी होत नाही व त्याला वर्ष वर्ष वेळ लागतो सन २०२३ मध्ये मोजणीचे किती अर्ज मार्गे लावले याची माहिती द्या अन्यथा जिल्हा भूमी अधिक्षक कार्यालय येथे लोकशाही मार्गाने आमरण उपोषण करू असे आंबेडकर विचार मोर्चा तथा आंबेडकर रिपब्लिकन मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी जिल्हा भूमी अध्यक्ष कार्यालय येथे दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.



# गेवराई शहरातील राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

### शेतकऱ्यांशी साधला संवाद

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरांमध्ये किसान कृषी विकास प्रतिष्ठानच्या वतीने कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. मराठा आरक्षणासाठी मागील अनेक महिन्यांपासून मनोज जरांगे हे मराठा आरक्षणासाठी आंदोलन करत आहेत. दरम्यान मराठा आंदोलनाचा लढा यशस्वी झाल्यानंतर शेतकऱ्यांसाठी लढा उभारणार असल्याचं त्यांनी एबीपी माझाशी संवाद साधताना घोषित केलं होतं. त्यातच आता त्यांनी राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे देखील उद्घाटन केले.

मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी तिथे उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांशी देखील संवाद साधला. यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी शेतकऱ्यांवर भाष्य केलं. त्यांनी म्हटलं की, शेतकऱ्यांची देखील अवस्था खूप बिकट आहे. त्यांच्या शेतीमालाला भाव मिळत नाही. त्यामुळे आत्महत्येचं प्रमाण देखील वाढलं आहे. आरक्षणाच्या प्रश्न मार्गी लागल्यानंतर शेतकऱ्यांच्या प्रश्नाला हात घालणार आहोत.

बळीराजासाठी मैदानात उतरणार

मनोज जरांगे यांच्यासोबत एबीपी माझाचे प्रतिनिधी चंद्रशेखर नेवे यांनी एक्सक्लुझिव्ह बातचीत केली होती. त्यावेळी 'शेतीविषयक सगळ्याच नेत्यांची उदासीनता आहे, मी माझ्या डोळ्याने बघतोय. शेतकऱ्यांचे प्रचंड वाईट हाल आहेत. मराठवाड्यात आणि विशेषता खानदेशात या नेत्यांना पाणी आणायला काय रोग झालाय का? शेतकऱ्यांना मदत सुद्धा वेळेवर मिळत नाही एक रुपयाचा विमा काढून ठेवलाय, तो काय कामाचा नाही. शेतकऱ्यांनी जगायचं कसं? आज या अस्मानी संकटामुळे शेतकरी बेजार झाला आहे, फाशी घ्यायला लागलाय शेतकऱ्यांना तुम्हाला आडवं केल्याशिवाय पर्याय नाही. आरक्षणाचा तिढा सुटल्यानंतर शेतकऱ्यांसाठी आवाज उठवणार'', असं जरांगे यांनी म्हटलं होतं.



### मग सरकारला वेळ कशाला हवा - मनोज जरांगे

शासन दरबारी मराठा कुणबी असल्याच्या नोंदणी सापडल्या आहेत. त्यामुळे सरकारने आता जास्तीचा वेळ न घेता तात्काळ आरक्षणासंदर्भातला निर्णय घेतला पाहिजे. स्वत: मुख्यमंत्र्यांनी अधिवेशनात बोलताना ज्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत त्या १९६७ पूर्वीच्या असल्याचे मान्य केलंय. ज्यांच्या नोंदी आढळले आहेत त्यांच्या रक्ताच्या नात्यातील लोकांना सरकार आरक्षण देण्यासाठी काय निकष लावणार आहेत. याबात सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी. मुंबईला जाण्यासाठी आम्हाला कोणाचेही बंधन नाही, समाज जो निर्णय घेईल त्याप्रमाणे आम्ही पुढचं आंदोलन करु. असं मनोज जरांगे यांनी म्हटलं.

## सर्वज्ञानी सुषमा अंधारेंनी आठ दिवसात दिलगिरीचे पत्र द्यावे, अन्यथा हक्कभंगास परवानगी

## विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हेंचा निर्वाणीचा इशारा

नागपूर ।प्रतिनिधी

उपसभापती रविंद्र धंगेकरांना सभागृहात बोलू देत नाहीत अशा आशयाचा व्हिडीओ ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी प्रसिद्ध केला होता. मुळात धंगेकर हे या सभागृहाचे सदस्य नाहीत त्यामुळे तात्काळ सुषमा अंधारे यांच्यावर हक्कभंग आणावा, अशी मागणी सत्ताधारी पक्षाने केली आहे. त्यानंतर सुषमा अंधारे यांना आठ दिवसात दिलगिरी व्यक्त करण्यास सांगितले आहे. दिलगिरीचे पत्र न आल्यास प्रविण दरेकरांना मी हक्कभंग मांडण्यास परवानगी देईल, असे विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे म्हणाल्या.

रविंद्र धंगेकर हे विधान सभेचे सदस्य आहेत तर मग विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे त्यांना बोलू कशा देत नाहीत? असा आक्षेपाचा मुद्दा भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी उपस्थित केला. त्यानंतर सुषमा अंधारेच्या मुद्द्यावर विरोधक आणि सत्ताधारी आमनेसामने आले.यावर नीलम गोऱ्हे म्हणाल्या, धंगेकर इकडे सदस्य नसताना मी कसे बोलू दिले नाही. याचे कोडे उलगडलेले नाही. अज्ञानी लोकांकडून चूक झाल्यास मी समजू शकते पण जे स्वत:ला ज्ञानी समजतात अशावेळी त्यांच्या अज्ञानाबद्दल साधी दिलगिरी व्यक्त करण्याचे तरी सौजन्य असू नये. त्या व्यक्तीला जाणीव करून दिली पाहिजे. सुषमा अंधारेंनी दिलगिरी व्यक्त करायला हवी. आठ दिवसांत दिलगिरीचे पत्र न आल्यास प्रविण दरेकरांना मी हक्कभंग मांडण्यास परवानगी देईन.ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी विधानसभेचे आमदार रविंद्र धंगेकर यांना बोलण्याची संधी उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी दिली नसल्याचा आरोप करत व्हिडिओ व्हायरल केला होता. यावरूनच प्रवीण दरेकर यांनी धंगेकर विधान परिषदेचे सदस्य नसतांना त्यांना बोलू न देण्याचा विषयच येत नसल्याचे मत मांडले. तसेच, अंधारे यांच्यावर हक्कभंग आणण्याचा प्रस्ताव दरेकर यांनी विधान परिषदेत मांडला.



# सुनील क्षीरसागरांनी जपली आवाज नसलेल्यांशी बांधिलकी-वार

बीड ।प्रतिनिधी

पत्रकारिता आणि वेगवेगळ्या चळवळींच्या माध्यमातून सुनील क्षीरसागरांनी कायम आवाज नसलेल्यांचा आवाज होण्याचे काम केले. आवाज नसलेल्यांशी बांधिलकी जपण्याचे 'मराठवाडा' चे व्रत सुनील क्षीरसागरांनी पुढे नेले असे प्रतिपादन संविधान अभ्यासक सुभाष वारे यांनी केले. पत्रकार, कार्यकर्ता असलेल्या सुनील क्षीरसागर यांच्या कार्यकर्ता जीवनाची चाळीशी आणि वयाची एकसष्ठीनिमीत्त आयोजित सेवागौरव सोहळ्यात ते बोलत होते. ज्येष्ठ समाजवादी नेते पन्नालाल सुराणा, संयोजन समितीचे अध्यक्ष अशोक देशमुख, सुनील क्षीरसागर, हेमा क्षीरसागर यांची उपस्थिती होती.

सुभाष वारे म्हणाले की समाजामध्ये जेव्हा खूप निराशेचं वातावरण असतं त्यावेळी चांगलं काम करणारांचे सत्कार प्रेरणा देणारे असतात. सुनील क्षीरसागर यांनी कायम पडद्यामागे राहून सामाजिक कार्य केले. हजेरी सहाय्यक संघटनेसाठी त्यांनी सक्रिय योगदान दिले. 'आपलं घरं' च्या लेकरांसाठी सुनील क्षीरसागर यांचं घरं कायम उघडं राहिलं, त्यांच्यासाठी हेमाताई आणि सुनील क्षीरसागर यांनी खुप कष्ट घेतले. बोलण्यापेक्षा काम करण्यावर त्यांचा जास्त विश्वास आहे. अनेकांना लिहितं करण्याच त्यांच काम वैशिष्ट्यपूर्ण आहे.एक ताठ कण्याचा संपादक म्हणून ते काम करित आहेत. आज फॅसिझम वाढत असताना, मोकाट सुटलेलं भांडवल अगदी माध्यमातही धुमाकूळ घालत असताना केवळ पत्रकारांनी मुकाबला करावा असं म्हणून चालणार नाही, तर त्याचा आपल्याला संघटीत मुकाबला करावा लागेल असेही सुभाष वारे म्हणाले. एआय अर्थात कृत्रीम बुध्दीहत्तेच देखील मोठ संकट समोर येत असल्याचही वारे म्हणाले. माणूसपणाच सत्व जपण्याचं, पुढं नेण्याचं काम आपल्यापरीने पुढे नेणारी जी माणसं आहेत सुनील क्षीरसागर त्यापैकी एक आहेत. अशाच साध्या पणत्यांची आपल्याला मशाल करायची आहे असेही वारे म्हणाले.

पन्नालाल सुराणा यांनी यावेळी पत्रकारिता करताना सुनील क्षीरसागर यांनी कधी सत्व सोडलं नाही. तरुण

(उर्वरीत पान २ वर)




### समाजाच्या प्रेमामुळेच मी टिकून राहिलो: क्षीरसागर

समाजकार्य करायचं म्हणून मी जेव्हा पन्नालाल सुराणा यांना बोललो त्यावेळी त्यांनी 'मराठवाडा' दैनिकात पाठविलं. माझं मराठवाडयात कोणी ओळखीचं नव्हतं, पण या भागाने, इथल्या लोकांनी माझ्यावर खूप प्रेम केलं. इतकं प्रेम कदाचित मला पश्चिम महाराष्ट्रातही मिळालं नसतं. वेगवेगळ्या चळवळी आणि संघटनांमधील लोकांनी प्रेम दिलं म्हणून माझा आजवरचा प्रवास होऊ शकला. या प्रवासात, माझ्या प्रत्येक उपक्रमात हेमा क्षीरसागर यांनी मला मोठी साथ दिली. या सगळ्या काळात वेगवेगळ्या संघटना, चळवळींमधून मला आनंद मिळविता आला. इथल्या लोकांच्या प्रेमामुळेच मी टिकून राहिलो असे सुनील क्षीरसागर म्हणाले.

# सासऱ्याने मारलं, जावयानं अख्खी सासुरवाडी संपवली!

## चौघांच्या हत्येनंतर यवतमाळ हादरलं

यवतमाळ : राज्यात हत्येच्या घटनांसाठी सतत चर्चेत राहणाऱ्या यवतमाळ जिल्ह्यातील कळंबमधील तिरझडा पारधी बेड्यावर रक्तरंजित घटना घडली. घरघुती वादातून जावयाने सासरा, दोन मेहुणे आणि बायकोलाच संपवलं. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेली सासू मात्र वाचली. मंगळवारी रात्री घडलेल्या घटनेमुळे यवतमाळ जिल्हा हादरून गेला. पत्नीच्या चरित्राच्या संशयावरून ही घटना घडल्याचं स्पष्ट झालं असून पोलिसांनी आरोपी गोविंद विरचंद पवारला अटक केली आहे.



जावयाने केलेल्या हल्ल्यात सासरा पंडित घोसले, मेहुणा ज्ञानेश्वर घोसले आणि सुनील घोसले, बायको रेखा गोविंद पवार अशी मृतांची नवे आहेत. सासू रुखमा पंडित घोसले गंभीर जखमी असून त्यांच्यावर यवतमाळ जिल्हा शासकीय रुणालयात उपचार सुरु आहे.

आरोपी गोविंद विरचंद पवार हा काही महिन्यांपूर्वी पत्नी रेखा सोबत सासुरवाडीत राहत होता. त्याला येथे सतत अपमानास्पद वागणूक मिळत असल्याचं बोललं जात आहे. यामुळेच दुखावलेल्या गोविंदने मंगळवारी मध्यरात्री संपूर्ण घरावरच सूड उगवला. तिरझडा गावात घरी झोपलेल्या पत्नी आणि मेहुण्याची हत्या केली. नंतर शेतात झोपलेल्या सासरा आणि दुसरा मेहुण्यावर हल्ला केला. यावेळी सासू थोडक्यात बचावली. मात्र तिची प्रकृती गंभीर आहे. हे हत्याकांड घडल्यानंतर संपूर्ण जिल्हा हादरला आहे.

### महिन्याभरापूर्वी मारहाणीची घटना

आरोपी गोविंद हा तिच्या पत्नीला मारहाण करत असल्याच्या कारणावरून सासरा पंडित घोसले आणि मेहुण्यांनी त्याला मारहाण केली होती. त्यानंतर मात्र सगळं काही व्यवस्थित झाल्याचं चित्र असताना एका महिन्यानंतर गोविंदने त्याचा बदला घेतल्याचं बोललं जातंय.

# किरकोळ भांडणातून पती कडून पत्नीचा निघृण खून

चोपडा/प्रतिनिधी

कौटूंबिक वादातून कुठल्यातरी धारदार हत्याराने सनकी पतीने पत्नी रेखाबाई दुरसिंग बारेला (४४) हिची धारदार शस्त्राने निघृण हत्या केल्याची घटना चोपडा तालुक्यातील धनवाडी शिवारात घडली. या घटनेत संशयित पती दुरसिंग बारेला (४७ धनवाडी) यास पोलिसांनी शिताफीने पकडून बेळ्या ठोकल्या आहेत.




पालीस सुत्रांकडून प्राप्त माहिती अशी की, चोपडा शहरापासून जवळच असलेल्या मध्यप्रदेश मधील पांजरिया पोस्ट धवली ता.वरला जि. बडवाणी येथील रहिवासी व कामानिमित्त धनवाडी शिवारात वास्तव्यास असलेल्या दूरसिंग टेटिया बारेला याचे व पत्नी रेखाबाई हिचे पैसे मागण्याच्या कारणावरून कडाक्याचे भांडण झाले. त्यात रागाच्या भरात पतीने पत्नीवर लाकडी दांडक्याने डोक्यावर तोंडावर व नको त्या ठिकाणी मारहाण करून गंभीर दुखापत करून जीवे ठार मारले.अन् तेथून पसार झाला. तर मुले आईच्या मृतदेहाजवळ बसून होती. मंगळवारी सकाळी हत्येचा प्रकार समोर आल्यानंतर चोपडा पोलिसांना कळविण्यात आले त्यानंतर चोपडा शहर पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक घनश्याम तांबे, दीपक विसावे, संतोष पारधी, ज्ञानेश्वर जवागे, गणेश सोनवणे यांनी २४ तासात खुनाची उकल करीत आरोपीला अटक केली आहे.

याप्रकरणी शहर पोलीस स्टेशनला योगराज नामदेव पाटील रा. खाचणे ता. चोपडा यांच्या फिर्यादीवरून सी सी टी एन एस. गुरनं ६३३/२०२३ भादवि कलम ३०२ प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील तपास पोउपनि घनश्याम तांबे हे करीत आहेत.




**नवी दिल्ली ।प्रतिनिधी**

**इंडिया आघाडीची आज अतिशय महत्त्वाची बैठक दिल्लीत पार पडली. या बैठकीत तब्बल २८ पक्षांचे प्रमुख नेते उपस्थित होते. या बैठकीत येत्या लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान पदासाठी इंडिया आघाडीची चेहरा कोण असेल? याबाबत चर्चा झाली. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या बैठकीत तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पंतप्रधान पदासाठी काँग्रेसेच राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचं फक्त नाव सूचवलं. यावेळी आपचे अध्यक्ष आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी ममता बॅनर्जी यांच्या मताला सहमती दर्शवली. विशेष म्हणजे खर्गे पंतप्रधान बनले तर देशाचे पहिली दलित समाजाचे पंतप्रधान होतील, असं वक्तव्य केजरीवाल यांनी बैठकीत केल्याची माहिती सूत्रांनी दिली. यानंतर २८ राजकीय पक्षांपैकी १६ राजकीय पक्षांनी खर्गेंच्या नावाला पाठिंबा दिला. यामध्ये शिवसेना ठाकरे गटाचा देखील समावेश असल्याची माहिती सूत्रांनी दिली.**

इंडिया आघाडीच्या बैठकीनंतर मल्लिकार्जुन खर्गे यांनी भूमिका मांडली. यावेळी त्यांना इंडिया आघाडीकडून पंतप्रधान पदाचा उमेदवार कोण असेल? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी पंतप्रधान कोण होणार याचा निर्णय आम्ही जिंकल्यानंतर घेऊ, अशी भूमिका मांडली. आमचं पहिलं काम निवडणूक जिंकणं हे आहे. त्यानंतर आम्ही ठरवू. आम्ही आधी जिंकण्यावर लक्ष केंद्रीत करु इच्छित आहोत. विजयानंतरच आम्ही पीएम पदाबाबत निर्णय घेऊ, असं मल्लिकार्जुन खर्गे यांनी सांगितलं.

# जय भवानी कन्या प्रशाला केज येथे विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वाटप

केज ।प्रतिनिधी

शाळेहून नाही थोर ते मंदिर,देणगी उदार, शाळेला द्या या गाडगे बाबाच्या विचारांचाआदर्श घेऊन विद्यार्थ्यांना आपण काही देणे लागतो या विचाराने प्रेरित होऊन उमरी ता.केज येथील रहिवासी व सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री. ढालमारे दिलीप सर यांच्या वतीने प्रतिवर्षी या उपक्रमाचे आयोजन केले जाते.शिकलेले नसताना वैज्ञानिक विचार मांडणारे, दीनदलित,गोरगरीब यांची सेवा करणारे संत गाडगे बाबांच्या पुण्यतिथीनिमित्त जय भवानी कन्या प्रशाला केज येथे प्रतिवर्षी या उपक्रमाचे आयोजन केले जाते.या दिवशी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात येते.केज शहरातील नामांकितजयभवानी कन्या प्रशाला केज येथे साहित्य वाटपानंतर संत गाडगे बाबांच्या जीवन चरित्रावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले याप्रसंगीशाळेचेमाध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक देशमुख पी.एम.यांनी गाडगेबाबांनी आपल्या जीवनात स्वच्छतेबद्दल, शिक्षणाबद्दल ज्याप्रमाणे जनजागृती केली त्याचा उहापोह विद्यार्थ्यांसमोर केला व सर्वांनी आज संत गाडगेबाबांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांचा आदर्श घ्यावा असे आवाहन केले व श्री ढालमारे सर यांच्या उपक्रमाबद्दल त्यांचे अभिनंदन केले व त्यांचे आभार मानले.याप्रसंगी सर्व शिक्षकांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्य



वाटप करण्यात आले.यावेळी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती गीता जगताप मॅडम उपस्थित होत्या.यावेळी शाळेच्या वतीने श्री.खुळे के.व्ही.यांनी आपले विचार मांडले तर बहारदार सूत्रसंचालनाची जबाबदारी देशमुख पी. आर यांनी पार पाडली. तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. नाईकनवरे सर,श्री.बचुटे सर,श्री देशमुख व्ही.पी. सर,श्री गिरी सर,सौ.पवार मॅडम,सौ.चोंदे मॅडम,सौ. मोरे मॅडम,सौ.जाधव मॅडम,सौ.खतिले मॅडम, शाळेचे शिंदे सर,श्री. जाधव सर ,श्री.भिमराव गिराम मामा यांनी परिश्रम घेतले.

# निर्णायक ईशारा सभेच्या निमित्ताने केज ते बीड दुचाकी रलीचे आयोजन

केज ।प्रतिनिधी

केज ते बीड भव्य दुचाकी रॅली मराठा आरक्षण संघर्षयोद्धे श्री.मनोज जरांगे पाटील यांच्या बीड येथील निर्णायक इशारा सभेच्या निमित्ताने जन जागृतीसाठी केज ते बीड दुचाकी रॅली चे आयोजन करण्यात आले आहे.या रॅलीत छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा ट्रॅक्टर-ट्रॉलीतून बीड सभास्थळापर्यंत नेण्यात येणार आहे.केज शहरातील व तालुक्यातील सकल मराठा बांधवांनी आपल्या दुचाकीसह दिनांक २२ डिसेंबर २०२३ रोजी शुक्रवारी सकाळी ९-०० वाजता भवानी मंदिर,धारूर रोड,केज येथे वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन सकल मराठा समाजाच्यावतीनेकरण्यात आले आहे.सदरीलरॅलीचा मार्गभवानी मंदिर,धारूर रोड केज,जयभवानी चौक बसस्थानक केज,छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड रोड,मस्साजोग,नांदूर फाटा,येळंबघाट,नेकनूर, मांजरसुंभा,पाली,पाटील मैदान(बीड बायपास)बीड असा रहाणार असुन सकल मराठा समाज बांधवांनी वेळेवर उपस्थीत रहावे असे आवाहन सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.



केज ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील काळेगाव घाट येथील बस स्थानका जवळील दिड कोटी रक्कमेच्या पुलाच्या बांधकामाचे भूमिपूजन आ.नमिताताई मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आले.या प्रसंगी उपस्थित श्री.ऋषीकेश भैया आडसकर,ता.अध्यक्ष भगवान केदार,शरद इंगळे,सुनिलआबा गलांडे, गाताडे गुरूजी,सुनिल घोळवे,शिवराम घुले, सचिन सिरसट,सुधीर शिंदे,संतोष देशमुख, जलिंदर गव्हाणे,अश्रुबा शिरसाट,अरुण तात्या काळे,अविनाश साबळे व सार्वजिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थीत होते.दरम्यान सदरील पुलाचे काम दर्जेदार व्हावे अशी अपेक्षा नागरीक व्यक्त करीत आहेत.



# शासन गाव निहाय पर्जन्य मापक बसवणार

## प्रा.ईश्वर मुंडे यांच्या मागणीला यश

किल्ले धारूर ।प्रतिनिधी

भारतीय शेती जुगारा प्रमाणे आहे म्हणतात कारण भारतीय शेती मोसमी पावसावर अवलंबून आहे.पीक आले आले म्हणता गेले गेले म्हणायची वेळ शेतकऱ्यांवर येते.या मध्ये कोठे पाऊस पडेल आणी कोठे पडणार नाही याचा भरोसा नाही.पुर्वीचे लोक म्हणायचे पुढे पुढे असा पाऊस पडेल की बैलाचे एक सिंग ओले होईल तर दुसरे सिंग कोरडे राहील.एवढ्या जवळच्या अंतरात पावसाचे प्रमाण कमी जास्त होईल. अशा पावसाची प्रचीती सध्या आपल्या देशात प्रामुख्याने महाराष्ट्रात येत आहे. काळ बदलला,निसर्ग बदलला पण शासनाचे नियम कांही बदलत नाहीत.त्या मुळे दुष्काळ असो की अती वृष्टी शासन नियमांचा फटका शेतकऱ्यांना बसत होता.

कारण तालुक्यात एक किंवा दोन ठिकाणी पर्जन्य मापक यंत्र बसविलेले आहेत ते कधी सुस्थीतीत तर कधी खराब झालेले असतात तर कधी नोंद घेण्यासाठी कर्मचारीच नसतो. या शासकीय व्यवस्थेत बळी मात्र शेतकऱ्यांचाच जात होता. तालुक्यांतील एक किंवा दोन पर्जन्य मापक नोंदी वरून दुष्काळ,अतीवृष्टी यांचे निकष ठरवणे यावरून पिकांची आनेवारी,पीक विमा ठरवणे हा शेतकऱ्यांवर खूप मोठा अन्याय होता. याला वाचा फोडण्यासाठी प्रा.ईश्वर मुंडे,प्रदेश सरचिटणीस,राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी यांनी किल्ले धारूर येथे धारूर तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा,सर सकट पीक विमा मंजूर करावा या मागणीसाठी दि.४ /९ /२०२३ रोजी झालेल्या सर्व पक्षीय शेतकरी रस्ता रोको मोर्चाचे वेळी आपल्या भाषणात प्रत्येक गावात पर्जन्य मापक यंत्र बसवून गाव निहाय पावसाची नोंद घेऊन पावसाचे प्रमाण ठरवावे व त्या नुसार शेतकऱ्यांना योजनेचे फायदे द्यावेत अशी जाहीर मागणी केली होती.पुढे त्यांनी शासन दरबारी पाठ पुरावा केला.काल राज्याचे कृषी मंत्री ना.धनंजय मुंडे यांनी विधान सभेत घोषणा करून शासन गाव निहाय पर्जन्यमापक यंत्र बसवणार आहे असे घोषीत केले.या घोषणेचे राज्यातील शेतकऱ्यांनी स्वागत केले आहे. गाव निहाय पर्जन्यमापक यंत्र बसवावे ही मागणी करून पाठ पुरावा केल्या बद्दल प्रा.ईश्वर मुंडे यांचे शेतकरी वर्गातून मोठ्या प्रमाणात अभिनंदन होत आहे.



# भारतीय नमो संघाचे नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष पत्रकार चंद्रकांत पाटील यांचा सत्कार संपन्न

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील जेष्ठ पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत पाटील यांची नुकतीच राष्ट्रीय एकता व अखंडतेसाठी काम करणाऱ्या भारतीय नरेंद्र मोदी संघाच्या केज तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली त्याबद्दल मित्रपरिवाराच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

याबाबत सविस्तर वृत्त असे की,मागील २५ वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात,सामाजिक क्षेत्रात काम करणारे चंद्रकांत पाटील यांची भारतीय नरेंद्र मोदी संघाच्या तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली.त्यांच्या पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्राचे अध्यक्ष भाऊसाहेब घोडके यांनी ही निवड केली.त्याबद्दल चंद्रकांत पाटील यांच्या सामाजिक, राजकीय व पत्रकारिता क्षेत्रातील मित्रपरीवाराच्या वतीने सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी छावा संघटनेचे जिल्हाप्रमुख शिवाजी दादा ठोंबरे,केज तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रवीण खोडसे, युवा पत्रकार दत्तात्रय मुजमुले यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT